चित्रपट क्षेत्रातील कॉपीराईट हस्तांतरणावरील
व विक्रीवरील विक्रीकराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय क्र मुवक १५.०७/प्र.क्र.- १३/कराधान-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक: २९मार्च २००७.

वाचा: १. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकअ-११.००/प्र.क्र.१५०(अ)/कराधान-१, दि. २१.०५.२००५.
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकअ-११.००/प्र.क्र.१५०/कराधान-१, दि. २१.०५.२००५
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकअ-११.००/प्र.क्र.१५०(अ)/कराधान-१, दि. १६.१०.२००६
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मुवक १५०७/प्र.क्र.१३/कराधान-१, दि. २० मार्च २००७.

**प्रस्तावना-**

मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ ला जोडलेल्या अनुसुची 'ग' मधील भाग १ च्या नोंद क्र. (२६)(९) नुसार व महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ (संक्षिप्त मध्ये महाराष्ट्र वस्तु हस्तांतरण कायदा, १९८५) ला जोडलेल्या अनुसुची मधील नोंद क्र.-२१(४) नुसार १ मे २००० पासून कॉपीराईटच्या विक्रीवर तसेच लीजवर ४ टक्क्याने कर लावण्याची तरतूद करण्यात आली होती.

याबाबत मोशन पिक्चर्स असोसिएशनने चित्रपटांच्या कॉपीराईटच्या लीजवरील तथा विक्रीवरील करासंबंधी निवेदन शासनाला केले होते. या व्यवसायिकांनी /संघटनांनी वेळोवेळी केलेल्या निवेदनांवर तसेच त्यांच्या अडचणींचा साकल्याने विचार करुन मा.वित्त मंत्री यांनी दि.२१ मार्च २००५ रोजी अर्थसंकल्पावर भाषण करतांना व्हिडीओ चित्रपटांसहीत चित्रपटांच्या कॉपी राईटच्या विक्रीवर मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील करास तसेच वस्तु हस्तांतरण अधिनियमाखाली येणाऱ्या लीजवरील करासंबंधी दि.१ मे २००० पासून योग्य ते प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे प्रस्तावित केले.

या अनुषंगाने शासनाने दिनांक २१ मे २००५ चे शासन निर्णय क्र. विकअ-११.००/ प्र.क्र.-१५०/कराधान-१ व विकअ-११.००/प्र.क्र.-१५०(अ)/कराधान-१ अन्वये दि. ०१.०५.२००० ते


PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

३१.०३.२००५ पर्यंतच्या कालावधीकरिता व्हिडीओ चित्रपटांसहीत इतर चित्रपटांच्याबाबतीत कॉपीराईटच्या हस्तांतरणावर लीज कायद्यान्वये जो कर लागू झाला असता तो प्रशासकीय सवलत म्हणून वसूल केला जाणार नाही, असे जाहीर केले.

वरील कराच्या अनुषंगाने जी शास्ती व व्याज लागू झाली असती त्याचीही प्रशासकीय सवलत जाहीर करण्यात आली होती.

शासन निर्णयात असेही नमूद केले होते की, प्रशासकीय सवलत अनुज्ञेय असण्याकरिता संबंधितांनी महाराष्ट्र मुल्यवर्धित कर २००२ अन्वये दि.३०.०९.२००५ पर्यंत नोंदणी दाखला घेणे आवश्यक होते.

नोंदणी दाखला घेण्याची दि.३०.०९.२००५ पर्यंत असलेली मुदत वाढविण्याचा निर्णय शासन निर्णय क्र. विकअ-११००/प्र.क्र.१५०/कराधान-१/ दि.१६ ऑक्टोबर २००६ अन्वये जाहीर केला. याबाबत मोशन पिक्चर्स असोसिएशनने चित्रपटांच्या कॉपीराईटच्या विक्रीवरील करावर शासन निर्णय दि. २१ मे २००५ नुसार माफी मिळत नसल्याने व संबंधित ब-याच करदात्यांना सदर कालावधीत नोंदणी दाखला घेता न आल्याने ही मुदत यथायोग्य वाढविण्याची विनंती केली होती. तसेच सदर सवलत जाहीर करताना मुंबई विक्रीकर कायदा, १९५९ अन्वये चित्रपटांच्या कॅापीराईटच्या विक्रीवरील करात सवलत दिल्याचे शासन निर्णयाचे प्रस्तावनेत नमूद करण्यात आले मात्र निर्णयातील शब्दरचनेमुळे तसा अर्थ स्पष्ट होत नसल्यामुळे सवलतीबाबत संभ्रम निर्माण झाला.

सदर आलेल्या निवेदनातील त्यांच्या अडीअडचणींचा साकल्याने विचार करुन शासनाने या पूर्वी घेतलेले दि.२१ मे २००५, दि. १६ ऑक्टोबर २००६ व २० मार्च २००७ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन, खालील प्रमाणे निर्णय केला आहे.

**शासन निर्णय:-**

१. दि.१.०५.२००० पासून ते ३१.०३.२००५ पर्यंतच्या कालावधीकरिता व्हीडीओ चित्रपटांसहीत चित्रपट कॉपीराईटच्या विक्रीवर अथवा हस्तांतरणावर मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ अथवा महाराष्ट्र वस्तु हस्तांतरण कर अधिनियम, १९८५ अन्वये जो कर लागू झाला असता तो, दि.१ मे २००० ते ३१ मार्च २००५ पर्यंतच्या कालावधीसाठी प्रशासकीय सवलत म्हणून, वसुल करण्यात येणार नाही.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

२. तसेच, त्या कराच्या अनुषंगाने जी शास्ती व व्याज लागू झाले असते त्याचीही वसुली, प्रशासकीय सवलत म्हणून, करण्यात येणार नाही. परंतू ज्या प्रकरणात या प्रकारचा कर, व्याज व शास्ती पूर्णत: किंवा अंशत: वसूल केली असेल किंवा भरली असेल त्या प्रकरणात न भरलेल्या किंवा वसूल न केलेल्या (दोहामधील जी माफी कमी प्रमाणात असेल त्या ) रकमेपर्यंतच माफी दिली जाईल. मात्र कोणत्याही कारणास्तव या शासन निर्णयाच्या प्रसिध्दीपूर्वी भरलेल्या कराचे रकमेचा परतावा मिळणार नाही.

३. प्रशासकीय सवलत अनुज्ञेय असण्याकरिता महाराष्ट्र मुल्यवर्धित कर २००२ अन्वये नोंदणी दाखल्यास पात्र असल्यास, सदर व्यापा-याने दि. ३०.०४.२००७ पर्यंत नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे.

४. प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार ,विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत असून, आवश्यकतेनुसार आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अपर विक्रीकर आयुक्त, विक्रीकर सहआयुक्त, विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन), ज्येष्ठ सहाय्यक विक्रीकर आयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), विक्रीकर अधिकारी अथवा त्या दर्जाखालील इतर संबंधित अधिका-यांना हे अधिकार प्रदान करण्याची परवानगी विक्रीकर आयुक्तांना देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा सांकेतांक २००७०४०२१२५७२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( शशांक माथने )**

**विशेष कार्यकारी अधिकारी.**

**प्रत:-**

माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८ वा मजला, माझगांव, मुंबई-४०००१०.( ४० प्रती)

२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई-३२.

९) निवड नस्ती, कराधान-१.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com